Loknete Hon. Hanmantrao Patil Charitable Trust's

# ADARSH COLLEGE, VITA

Shriramnagar, Mayani Road

Tal- Khanapur Dist- Sangli 415 311

Website-www.acvita.edu.ac.in

Reaccredited by NAAC with 'A' Grade (CGPA-3.14)

Permanently Affiliated to Shivaji University, Kolhapur

ADARSH COLLEGE, VITA
ज्ञानान्वेषणम्
• ESTD-1999 •
IN PURSUIT OF KNOWLEDGE

## FACULTY FELICITATION



Loknete Hon. Hanmantrao Patil Charitable Trust's

# ADARSH COLLEGE, VITA

Shriramnagar, Mayani Road

Tal- Khanapur Dist- Sangli 415 311

Website-www.acvita.edu.ac.in

Reaccredited by NAAC with 'A' Grade (CGPA-3.14)

Permanently Affiliated to Shivaji University, Kolhapur

ADARSH COLLEGE, VITA

ज्ञानान्वेषणम्

•ESTD-1999•

IN PURSUIT OF KNOWLEDGE

## A PROGRAMME REPORT



# सेवापूर्ती सत्कार समारंभ

प्राध्यापक प्रबोधनी अंतर्गत आदर्श कॉलेज विटा येथे शुक्रवार दिनांक ०४/०७/२०२५ रोजी सेवापूर्ती सत्कार समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष व लो. हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मा. सदाशिवरावभाऊ पाटील यांनी श्री.खुरुद यांना सेवानिवृत्ती निमित्त व भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमांमध्ये प्राचार्य डॉ. यु.के. मोहिते सर म्हणाले की, कॉलेजच्या जडणघडणीत प्रत्येक सेवकाचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. श्री. खुरुद सर यांनी ज्या निरनिराळ्या संकल्पना राबवल्या त्याचा पुढील काळात ग्रंथालयास फायदा होईल

या परिसरातील सर्वसामान्य, गोर-गरीब,शिक्षणापासून वंचित असणाऱ्या सर्वांना शिक्षणाची संधी निर्माण व्हावी व विद्यार्थ्यांच्या सह कर्मचाऱ्यांच्या मध्ये सुसंस्कृत विचार रुजवावेत आणि एक आदर्श निर्माण करावा म्हणून संस्था तत्पर आहे म्हणूनच लोकनेते मा.हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना केली. असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य व सांगली जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य मा.वैभवदादा पाटील यांनी केले. आदर्श कॉलेजचे ग्रंथपाल श्री. शिरीष खुरुद यांच्या सेवापूर्ती सत्कार समारंभाचे वेळी बोलत होते. पुढे ते म्हणाले की हणमंतराव साहेबांनी या परिसरातील प्रत्येक व्यक्तीवर कुटुंबातील सदस्य प्रमाणे प्रेम केले. त्यांच्याच विचारांचा वारसा घेऊन या संस्थेमध्ये असणाऱ्या प्रत्येक सदस्या सोबत आम्ही कौटुंबिक जिव्हाळा निर्माण करण्यामध्ये यशस्वी झालो आहोत. म्हणून आज कर्मचारी सेवानिवृत्त होत असताना त्यांच्या संस्थेप्रति सकारात्मक भावना अतिशय बोलक्या आहेत. इथून सेवानिवृत्त झालेला कर्मचारी गेल्यानंतर सुद्धा संस्थेला विसरत नाही हे महत्वाचे आहे. सत्कारमूर्ती शिरीष खुरुद यांनी आपल्या कार्यकाळातील सर्व अनुभव सांगितले व सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल संस्थेच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य प्रा. डॉ. निवासराव वरेकर, प्राध्यापिका नूतन राऊत व सौ. ज्योती खुरुद यांनी मनोगत व्यक्त केली. या वेळेला संस्थेचे सल्लागार माजी प्राचार्य डॉ. प्रकाश मोकाशी, विश्वस्त बापूसाहेब उजागरे, अथर्व खुरुद, नेहा खुरुद,मानसी खुरुद उपस्थित होते.

प्रस्ताविक प्राध्यापक प्रबोधिनीचे समन्वयक प्रा.डॉ. राजेसाहेब संदे यांनी केले. आभार अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रा. डॉ.विहार निसरगंध यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. बाळासाहेब यांनी केले. संस्थेच्या वतीने श्री. खुरुद यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Adarsh College, Vita, Tal.Khanapur, Dist-Sangli, Estd. 1999

Convenor.

Principal
Adarsh College,Vita
Tal.Khanapur,Dist.Sangli




प्रा. खुरुद सरांचा सत्कार करताना मा.भाऊ



दीप प्रज्वलन करताना मान्यवर




प्रा. खुरुद सरांचा सत्कार करताना मा.दादा




मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष

Adarsh College, Vita
Estd. 1999
Tal-Khanapur, Dist. Sangli

पुण्य नगरी

# संस्कारक्षम पिढी घडवण्यासाठी संस्था तत्पर

## वैभव पाटील : शिरीष खुरुद यांचा सेवापूर्ती सत्कार

**तासगाव / प्रतिनिधी :** या परिसरातील सर्वसामान्य, गोर-गरीब, शिक्षणापासून वंचित असणाऱ्या सर्वांना शिक्षणाची संधी निर्माण व्हावी व विद्यार्थ्यांसह कर्मचाऱ्यांमध्ये सुसंस्कृत विचार रुजवावेत आणि एक आदर्श निर्माण करावा म्हणून संस्था तत्पर आहे म्हणूनच लोकनेते हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना केली, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य व सांगली जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य वैभवदादा पाटील यांनी केले.

आदर्श कॉलेजचे ग्रंथपाल शिरीष खुरुद यांच्या सेवापूर्ती सत्कार समारंभाचे वेळी बोलत होते. ते म्हणाले की, हणमंतराव



**विटा : आदर्श कॉलेजचे ग्रंथपाल शिरीष खुरुद यांच्या सेवापूर्ती सत्कार समारंभात बोलताना वैभव पाटील.**

साहेबांनी या परिसरातील प्रत्येक व्यक्तीवर कुटुंबातील सदस्याप्रमाणे प्रेम केले. त्यांच्याच विचारांचा वारसा घेऊन या संस्थेमध्ये असणाऱ्या प्रत्येक सदस्या सोबत आम्ही कौटुंबिक जिव्हाळा निर्माण करण्यामध्ये यशस्वी झालो आहोत. म्हणून आज कर्मचारी सेवानिवृत्त होत असताना त्यांच्या संस्थेप्रति सकारात्मक भावना अतिशय बोलक्या आहेत. इथून सेवानिवृत्त झालेला कर्मचारी गेल्यानंतर सुद्धा संस्थेला विसरत नाही, हे महत्वाचे आहे. सदाशिवरावभाऊ पाटील यांनी श्री. खुरुद यांना शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. यु. के. मोहिते म्हणाले की, कॉलेजच्या जडणघडणीत प्रत्येक सेवकाचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. श्री. खुरुद यांनी ज्या संकल्पना राबवल्या त्याचा पुढील काळात ग्रंथालयास फायदा होईल. सत्कारमूर्ती शिरीष खुरुद यांनी आपल्या कार्यकाळातील सर्व अनुभव सांगितले व सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल संस्थेच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली. प्रास्ताविक प्राध्यापक प्रबोधिनीचे समन्वयक प्रा. डॉ. राजेसाहेब संदे यांनी केले. आभार अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रा. डॉ. विहार निसरगंध यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. बाळासाहेब यांनी केले. संस्थेच्यावतीने खुरुद यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Sangli Edition
Jul 06, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

**Co-ordinator**
IQAC
Adarsh College, Vita

**PRINCIPAL**
Adarsh College, Vita
Tal-Khanapur, Dist-Sangli